# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

**कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)**

कुलसचिव | दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२


वाचा : १. शासन निर्णय क्र. गणवेश-२०२४/प्र.क्र.६७/जपुक (२९), दिनांक १० ऑक्टोबर, २०२४

२. विद्यापीठ परिपत्रक क्र. साप्रवि/भांडार/शिलाई/धुलाई/२००८, दिनांक २२/०८/२००८

## परिपत्रक

क्र. साप्रवि/भांडार/शिलाई-धुलाई भत्ता/३५९०/२०२५ दिनांक : ६ फेब्रुवारी, २०२५

विद्यापीठातील चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या गणवेशाच्या विविध बाबींमध्ये म्हणजेच शिलाई दरात सुधारणा करणे, महिला कर्मचाऱ्यांच्या ब्लाऊजचे शिलाई दर वाढविणे, गणवेश धुलाई भत्ता दरात सुधारणा करणे तसेच गरम कपडयाच्या गणवेशाच्या शिलाई दरात खालीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| बाब | कालावधी | विद्यापीठ परिपत्रक दि.२२/०८/२००८ नुसार दर | सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| शर्ट पँट शिलाई दर | दोन वर्षातून एकदा | रु.२५०/- प्रत्येक जोडीसाठी (एक शर्ट व एक पँट) | रु.७५०/- प्रत्येक जोडीसाठी (एक शर्ट व एक पँट) |
| ब्लाऊजचा शिलाई दर | दोन वर्षातून एकदा | रु.५०/- (प्रत्येक ब्लाऊज साठी) | रु.२५०/- (प्रत्येक ब्लाऊज साठी) |
| लोकरीचा गणवेश शिलाई दर | चार वर्षातून एकदा | रु.३५०/- | रु.१५००/- |
| धुलाई भत्ता | दर महा | रु.५०/- | रु.२५०/- |

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. गणवेश-२०२४/प्र.क्र.६७/जपुक (२९), दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ नुसार उपरोक्त विवरणपत्रातील दरास खालील अटींच्या अधीन मान्यता देण्यात येत आहे.

१) विद्यापीठातील चतुर्थश्रेणी संवर्गातील गणवेशपात्र कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाई व धुलाई भत्ता अनुज्ञेय करतांना, या कर्मचाऱ्यांकडून कार्यालयीन वेळेत नियमितरित्या गणवेश परिधान करण्यात येत असल्याची तपासणी करण्याची / लक्ष ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख यांची राहील.

२) गणवेश शिलाई व धुलाई भत्त्याची देयके चतुर्थश्रेणी संवर्गातील गणवेशपात्र कर्मचाऱ्यांकडून संबंधित कार्यासनास विहीत कालावधीत सादर करण्यात येत असल्याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी विभाग / कार्यालयाची राहील. तसेच या कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाई दराची व धुलाई भत्त्याची रक्कम प्रदान करताना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २६/०३/२००८ च्या परिच्छेद ५ नुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित विभागांची राहील. सदर परिच्छेद ५ खालीलप्रमाणे उद्धृत करण्यात येत आहे;

***"शिलाई दराची रक्कम व धुलाई भत्त्याची रक्कम प्रदान करताना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकःसीएलओ-१०७०/एक्सएल, दिनांक ०९.१०.१९७० मध्ये नमूद केलेल्या शर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्रमांकः सीएलओ-१०७०/४/एल, दिनांक ५ जानेवारी, १९७१ अन्वये चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले गणवेश कार्यालयीन वेळेत परिधान करणे आवश्यक आहे. तथापि, या सूचनांचे काटेकोर पालन होत नाही असे निदर्शनास आल्यामुळे कार्यालयीन वेळेत गणवेश परिधान न करणाऱ्या शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांविरुध्द दिनांक ३१ जानेवारी, १९८५ चे शासन परिपत्र क्रमांक - पोषाख-१०८४/११२/२९, तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-गणवेश-३४०२/प्र.क्र.११३/२००२/२९, दिनांक ३१ ऑगस्ट, २००२ अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्याही सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. तेव्हा हया सूचनांचा पुनरुच्चार करुन गणवेश परिधान न करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७१ मधील नियम क्रमांक १० खाली शिस्तभंगाची कारवाई करण्याच्या सूचना संबंधित शासकीय कार्यालयांना याव्दारे देण्यात येत आहेत".***

..२..

३. बाह्ययंत्रणेने भरण्यात येणाऱ्या चतुर्थश्रेणी पदांना प्रस्तावित गणवेश शिलाईभत्ता, धुलाईभत्ता अनुज्ञेय असणार नाही, याची दक्षता घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

४. सुधारीत दरामुळे येणारा वाढीव खर्च विहीत लेखाशिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित विभागांची / नियंत्रण अधिकारी यांची राहील.

उपरोक्त विवरणपत्रातील रकाना क्रमांक ४ मधील सुधारीत दर विद्यापीठ तसेच संलग्न अनुदानीत संस्थांमधील चतुर्थश्रेणी संवर्गातील गणवेशपात्र कर्मचाऱ्यांना वरिल अटी व शर्तींच्या अधीन दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ पासून लागू करण्यात येत आहेत.

मा. कुलगुरू महोदयांचे मंजुरीने.

(वाय. एम. राजुरकर)
उपकुलसचिव (सामान्य प्रशासन),
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रति,

१. संचालक (सर्व)________, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला,

२. अधिष्ठाता (सर्व)________, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला,

३. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)________, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला,

४. विभाग प्रमुख (सर्व)________, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला,

५. वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व)________, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला,

६. नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला,

७. उपकुलसचिव (शिक्षण / आस्थापना / सामान्य प्रशासन), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला,

८. मा. कुलगुरू / कुलसचिव यांचे स्वीय सहायक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला,

९. सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला,

१०.प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

(वाय. एम. राजुरकर)
उपकुलसचिव (सामान्य प्रशासन),
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला